


WWJMRD 2020; 6(4): 24-25
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
*E-ISSN: 2454-6615*

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी,सामाजिक शास्त्रे प्रशाळा,इतिहास विभाग,
कबचौउमवि,जळगाव,

# ''इतिहासातील फ्रॉडेंज-म्हणजे गोफणगुंडे:-एक इतिहासाची उजळणी''

## वळवी विश्वास गोरखनाथ

**प्रस्तावना:-**

जगात भरपूर युद्धे झाली पण प्रत्येक युद्धात चिन्हांचा वापर करण्यात आला ,१६४८ मध्ये झालेल्या फ्रेंच राजमुकुटाच्या बंडातही या चिन्हांचा वापर केला गेला. *रॉबर्ट ग्रीन लिहितात* _"फ्रेंच राजमुकुटाच्या विरोधातील बंडाच्या वेळी राजाशी इमान ठेवणाऱ्यांनी या पुडाई करणाऱ्या लोकांची निर्भत्सना केली.त्यांना अत्यंत तुच्छतेने पाहिले.मोठ्या मुलांना घाबरवण्यासाठी लहान मुले गोफणगुंडे वापरतात-त्या उठवळ गोफणगुंड्याची उपमा ( *फ्रॉडेंज* -फ्रेंचमधील शब्द) राजाच्या पक्षातील लोकांना बंडखोरास दिली.प्रतिकात्मक चिन्हांसारखा या तुच्छतापूर्ण संज्ञेचा वापर करायचा निर्णय कार्डिनल रेझनने घेतला.या उठावाचे नाव आता *फ्रॉडे* असे पडले आणि उठावकर्त्यांना *फ्रॉडेंअर* या नावाने संबोधण्यात येऊ लागले.गोफणगुंड्याचे प्रतीक म्हणून त्यांच्या *हॅटमध्ये* ते टिकरीसारखी चौकट खोचू लागले. *गोफणगुंडा* हा शब्द एकत्र जमण्याचा,एकाच उद्दिष्टांच्या छत्राखाली एकत्र येण्याचा संकेत बनला.या साऱ्याशिवाय बंडखोर विखुरले असते.उठवाचा दारूण शेवट झाला असता.

**फ्रॉडेंअरची सुरुवात:-**

''आधुनिक काळात अनेक बंडांची सुरुवात झाली, तसेच आर्थिक कारणांनी ही चळवळ सुरू झाली. १६४३ सालच्या मे महिन्यात लुईचा मृत्यू झाला तेव्हा फ्रान्सची आर्थिक परिस्थिती फारच बिघडली. १६३५ पासून राज्य तीस वर्षांच्या युद्धात (१६१८-१६४८) सामील होते. या युद्धात त्याचा मुख्य शत्रू स्पेन होता. यामुळे १६३० ते १६४० या काळात दुप्पट खर्च झाला. मुख्यतः युद्धाच्या परिणामांमुळे, १६४० च्या दशकाच्या सुरुवातीला, सुमारे ७० टक्के महसूल खर्च होत होता. लष्कराच्या गरजा भागवण्यासाठी लुई तेरावा आणि त्यांचे मुख्य मंत्री कार्डिनल रिचेलियू (१५८५-१६४२) यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मनी मार्केटवर पैसे उधार घेतले होते आणि करांमध्ये नाट्यमयवाढ केली होती. त्या रिजेंटने वेगळे धोरण स्वीकारण्याचा कोणताही हेतू दाखवला नाही. तिचे सरकार शेतकऱ्यांकडून नेहमीचा थेट हक्क गोळा करत राहिले, काही विशेषधिकारांनी नवीन अप्रत्यक्ष कर तयार करून लक्ष्य केले. दुर्दैवाने, राज्याची आर्थिक यंत्रणा सरकारला आवश्यक असलेला पैसा उभा करू शकली नाही. यामुळे काम चालू

**Correspondence:**
**वळवी विश्वास गोरखनाथ,**
संशोधक विद्यार्थी,सामाजिक शास्त्रे प्रशाळा,इतिहास विभाग,
कबचौउमवि,जळगाव,

ठेवण्यासाठी अपवादात्मक उपाययोजना कराव्या लागत होत्या. या क्षेत्रातील अनेक महसूल आधीच गहाण ठेवण्यात आला होता: एक उदाहरण द्यायचे झाले तर १६४६ मध्ये, राजा च्या कौन्सिलकडून १६५१ च्या पावत्यांमधून ९,६२,८५० लिवर्स पुढे करण्यास सांगितले गेले! शिवाय, लुई तेरावा आणि रिचेलियू या दोघांच्या मृत्यूनंतर राजकीय परिस्थिती मुळे राज्यकारभार करणे अधिक कठीण झाले. पहिली गोष्ट म्हणजे, बाळ लुई चौदावा याला अजून ही व्यक्ती फ्रान्समधील सत्तेच्या वैयक्तिक स्वरूपाचा एक भाग असलेल्या अभिजात लोकांशी वैयक्तिक संबंध प्रस्थापित करू शकली नाही. दुसरे म्हणजे, रिचेलियूने बांधलेले संरक्षक जाळे, ज्यात प्रांतीय सुभेदारांची महत्त्वाची भूमिका होती, ती त्याच्या निधनानंतर चक्क गायब झाली. तिसरी गोष्ट म्हणजे, अनेक प्रांतीय संस्थांना अशी आशा होती की, दिवंगत राजा आणि त्याच्या पूर्वसुरींनी आयोजित केलेल्या सत्तेचे केंद्रीकरण थांबेल. थोडक्यात, युद्धाच्या मध्यावर सरकारपुन्हा बांधणे आवश्यक होते. त्या काळात मुकूटाच्या आर्थिक मागण्यांमुळे लोक संतप्त झाले होते.''

**फ्रॉडेंअरची आधुनिक व्याख्या :**-

माणूस जेव्हा आपल्या विचारांना एखाद्या विशिष्ट विचाराप्रती कट्टरवादी धोरणाचा अवलंब करतो.तेव्हा तो गोफणगुंडा अथवा फ्रॉडेंअर बनतो.आज आधुनिक समाजात असेच फ्रॉडेंअर समाजात अस्थिरता निर्माण करण्यासाठी फिरत असतात,आपल्या विचारांचा कट्टरवादाच्या प्याला घेऊन सामान्य अज्ञानी माणसांवर ते निशाणा साधत असतात.त्यामुळे ज्ञानवंत होऊन अशा विचारसरणीशी लढा देणे हेच सामान्य मनुष्यासाठी उत्तम.

इसवीसनाच्या चौथ्या शतकात सम्राट कोन्स्टटाईन हा सुर्योपासक होता. सूर्याकडे पाहत असतांना त्याला क्रुसचे चिन्ह दिसले आणि तो अनेक युद्धात विजयी ठरला.त्यामुळे त्याने रोमचा राजधर्म म्हणून ख्रिस्ती धर्म जाहीर केला.पण काय झाले? शेवटी मार्टिन ल्युथरने धर्मसुधारणा केली नाही तो पर्यंत १००० हजार वर्षे ख्रिस्ती लोकांवर उंचवर्णीयांनी आणि उच्चपदस्थांनी धर्माचा नावावर सामान्य माणसांची आर्थिक आणि शारीरिक पिळवणूक केली.एखादे चिन्हं हे सुधारणेचे प्रतीक होऊ शकत नाही,ते फक्त युद्धाचे प्रतीक वापरले जाते पण सामान्य माणसे त्यात दडली जातात.

युरोपात ख्रिस्ती धर्माला उलट राज्यसत्ता आणि धर्मसत्ता मिळाल्याने खरा ख्रिस्ती धर्म उरलाच नाही.इतिहासात जरी या चिन्हाचा वापर करून बंडखोरांना एकत्र जमवून अनेक युद्धांना विजयाचे रूप देण्यात आले.तरी आधुनिक काळात आज अनेक चिन्हांचा वापर हा फक्त राजकारणाच्या स्वार्थासाठी वापरण्यात येतो आणि सामान्य जनता त्यात पिळली जाते._ *तरी कट्टरवाद आणि परंपरावाद जागतिक स्तरावर कमी होतांना दिसत नाही.म्हणून आज.प्रतीके,चिन्हे,रंग, रूप,जात,धर्म,वंश,प्रदेश,भाषा,विचार, या चिन्हाच्या माध्यमातून होणाऱ्या बंडापासून आणि गोफणगुंड्यापासून सावधान; कारण या घटकांनी फक्त आणि फक्त सामान्य माणसाची आर्थिक आणि शारीरिक पिळवणूक केलेली आहे,असे इतिहास सांगतो.

**निष्कर्ष:-**

सत्य इतिहासाचा न्याय आदर्शवादाचा यावर भाष्य करतांना .कीथ जेनकिंस म्हणतात "इतिहास म्हणजे सिद्धांत आणि सिद्धांत म्हणजे आदर्शवाद, आणि आदर्शवाद म्हणजे केवळ भौतिक स्वार्थ''.इतिहास हा निस्वार्थ असला पाहिजे भौतिक सुखासाठी इतिहासाचे वाटोळे लावणारे आणि समाजाला खोटे सिद्धांत देऊन वाद निर्माण करणाऱ्यांची जगात कमी नाही; *आधुनिक इतिहासलेखनालातून खोट्या सिद्धांताचा आणि खोट्या आदर्शवादाचा बुरखा जोपर्यंत हाणून पाडला जात नाही.तोपर्यंत सत्य (खऱ्या) इतिहासाला न्याय मिळणार नाही

पूर्वग्रह आणि संशोधन याचे महत्व विशद करतांना जॅक्स डेरिडा लिहितात "पूर्वग्रह और पक्षधरता आलोचनात्मक बुद्धी को दबाकर आलोचनात्मक अनुसंधान से रोकती हे." शुद्ध इतिहासलेखन करतांना पूर्वग्रहाची कीड सोडावी. विचारांचे पक्षांतर असले तरी सत्य आणि वस्तुनिष्ठता पाळावी.* इतिहासलेखनात जर पक्षांतर झाले आणि पूर्वग्रहाने ग्रासले तर इतिहासासोबत इतिहासकारांची देखील बुद्धी भ्रष्ट होते.तर त्यात आश्चर्य मानावे असे काही नाही.कारण सत्याच्या कसोटीसाठी उभे राहणारे आणि तटस्थ उभे राहून इतिहासाचे पक्षांतर करून लोकांच्या बुद्धीला वेगळे वळण देणारेही इतिहासकारच असतात.

**संदर्भग्रंथसूची:-**


1. https://www.encyclopedia.com/history/modern-europe/french-history/fronde.date 14/05/2020
2. सत्ता.रॉबर्ट ग्रीन.अनु.अनघा दिघे.व्हिवा बुक्स लिमिटेड.२०१४
3. नव्या जगाचा आरंभ.संदीप वासलेकर.साकेत प्रकाशन २०१६
4. पाश्चात्य विचारसरणीच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे,जयंत लेले.युनिक अकेडेमी.२०१३